# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**


No,CGRF /AZ//AUR/U/ 173 /2009 / 07/ Date :-

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer
O&M Urban Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub :- Forwarding of grievance in respect of M/s Metro Engineering, C/o Shantilal Dagdurao Muthiyan , Resi."Shanti" Khadkeshwar, Aurangabad ( Con.No.490011355461)

Dear Sir

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from** M/s Metro Engineering, C/o Shantilal Dagdurao Muthiyan , Resi."Shanti" Khadkeshwar, Aurangabad

You are requested to submit your parawise reply at the time of hearing which will be held on **27.01.2009 at 12.40 Hours .**

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above

Copy to:-
M/s Metro Engineering,
C/o Shantilal Dagdurao Muthiyan ,
Resi."Shanti"
Khadkeshwar, Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१७३/२००९/०७**

| | |
|---|---|
| **तक्रार दाखल** | **दिनांक :- १३/०१/२००९** |
| **निकाल** | **दिनांक :- ०७/०२/२००९** |

**मेट्रो इंजिनीयरींग,**
**डब्ल्यु-५९ एम.आय.डी.सी.,**
**वाळुज औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११३५५४६१)** **अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर मंडल औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १३/०१/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २७/०१/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराचे वाळुज एम.आय.डी.सी. औरंगाबाद येथे कारखाना असुन तो त्यांना एम.आय.डी.सी. विभागाकडे हस्तांतरीत केल्यानंतर त्यांनी महावितरण कंपनीकडे सुरक्षा रक्कम परत करण्याबाबत विनंती केली. अनेक वेळा पत्रव्यवहार व प्रत्यक्ष भेटीनंतर सुध्दा त्यांना सुरक्षा रक्कम परत न मिळाल्यामुळे त्यांनी मंचात तक्रार दाखल कली असुन व्याजासहीत सुरक्षा रक्कम परत करण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक २७/०१/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी श्री शांतीलाल मुथीयान उपस्थित होते. महावितरण तर्फे नोडल अधिकारी श्री राठौर, वाळुज विभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री सरक तसेच लेखाविभागाचे श्री कुलकर्णी उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी अर्जदाराने भरलेली रूपये २०१००/- सुरक्षा रक्कमेचा धनादेश अर्जदारास परत करण्यासाठी तयार करण्यात आला असल्याचे सांगितले. मंचाने सुरक्षा रक्कमेवरील व्याजा बद्दल विचारणा केली असता व्याजाची रक्कम धनादेशात समाविष्ट केली नसल्याचे सांगितले. मंचाने नोडल अधिकारी यांना व्याजाची रक्कम तसेच अर्जदाराने भरलेली सुरक्षा रक्कम व त्यावर आधी देण्यात आलेले व्याजा बद्दलची माहिती पुढील सुनावणी अगोदर मंचात दाखल करण्याचे सांगितले व पुढील सुनावणी दिनांक ३१/०१/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३) दिनांक ३१/०१/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदारास महावितरणच व्याज दराप्रमाणे सुरक्षा रक्कमेवर व्याज देण्याची तयारी दर्शविली नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेला व्याजाचा रक्कमेचा तपशील अर्जदारास दाखविला अर्जदाराने तो मान्य असल्याचे सांगितले तसेच मंचाने त्याची पाहणी केल्यानंतर ते योग्य असल्याचे आढळले.

वरील प्रकरणात अर्जदार व महावितरण कंपनी यांच्यात समझोता झाल्यामुळे प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

---

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

---

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१७३/२००९/०७** **दिनांक ;-**

**प्रति,**
**मेट्रो इंजिनीयरींग,**
**डब्ल्यु-५९ एम.आय.डी.सी.,**
**वाळुज औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१७३/२००९/०७ )

आपण दिनांक १३/०१/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**